# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्रमांक : २५६/२०१७

## सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये (अव्यवसायिक)/विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७–१८

### "क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना"
### "आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"
### "राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"
### " सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना"

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७–१८ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **"क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना"**

  शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विद्यापीठाकडून सदर अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त १० व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त ५ विद्यार्थीनीस गुणानुक्रमे रू. ५०००/— अर्थसहाय्य देण्यात येते. (सविस्तर नियम व अटी सोबत जोडले आहे.)

- **"आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"**

  आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून ही अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त २० व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त १० विद्यार्थ्यास गुणानुक्रमे अर्थसहाय्य देण्यात येते. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमासाठी रू. ३०००/— व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रू. ६०००/— अर्थसहाय्य देण्यात येते (सविस्तर नियम व अटी सोबत जोडले आहे.)

- **"राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"**

  मागासवर्गीय घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने ही शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केली आहे. सदर योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असून अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एकुण १२०० व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एकुण ८०० विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील. त्यापैकी ५०% मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा एकत्रित गुणवत्तेनुसार व उर्वरित ५०% विद्यार्थ्यांचा त्या त्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार गुणानुक्रमे अर्ज विचारात घेतले जातील. पात्र विद्यार्थ्यांस पदवी अभ्यासक्रमास रू. १२,०००/— व पदव्युत्तर अभ्यासक्रमास रू. १८,०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल.(सोबत नियम व अटी जोडले आहे).

- **" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती"**

  गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाने ही शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एकुण १२०० व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एकुण ८०० विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील. पात्र विद्यार्थ्यांस पदवी अभ्यासक्रमासाठी रू. १२,०००/—व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रू. १८,०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत नियम व अटी जोडले आहे.)

..२

**अर्ज करण्याची पद्धत :**

- वर उल्लेख केलेल्या शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेकरीता विहित नियम व अटी विचारात घेऊन पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने http://bcud.unipune.ac.in/Scholorships/scholarships/Login.aspx या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक असून आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत **Upload** करावीत. सोबत अर्ज करण्याची माहितीपुस्तीका जोडत आहोत.
- विहित केलेल्या नियमानुसार विद्यार्थी दोन शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र असल्याने एका पेक्षा जास्त शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावयाचा असल्यास एकाचवेळी अर्जातील योग्य ते दोन पर्याय निवडता येईल.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने सादर केलेले अर्जातील माहिती संबधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी काटेकोरपणे छाननी करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने विद्यापीठास विहित मुदतीत सादर करावी.

**उपरोक्त अर्थसहाय्य योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक:**

- वरील शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी **दि. १५/०१/२०१८** पर्यंत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावा.
- महाविद्यालय/विद्यापीठ विभागाने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने भरलेल्या अर्जांची छाननी करून आपल्या महाविद्यालयाच्या **PUNCODE** वरून **दि. २०/०१/२०१८** पर्यंत Online पद्धतीने विद्यापीठास सादर करावी.
- विद्यापीठ विभाग/महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे अर्ज **(Hard Copy)** स्वीकारले जाणार नाहीत.
- महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज तपासुन अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरीत ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे सादर करण्याची प्रक्रिया करावी.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माहिती भरताना विद्यार्थ्याने दिलेली बँकेची माहिती अचुक व काळजीपूर्वक भरावी.

या परिपत्रकाद्वारे अव्यवसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेअंतर्गत विहित नियम व अटी विचारात घेऊन माहिती वर उल्लेख केलेल्या वेळापत्रकानुसार विद्यापीठाच्या **http://bcud.unipune.ac.in/Scholorships/scholarships/Login.aspx** या लिंकवर वरून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावेत.

**ऑफलाईन (Offline) अर्जाचा अर्थसहाय्य योजनेसाठी विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

**उपकुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

गणेशखिंड,पुणे–७ )
संदर्भ:–शै.प्रवेश/४५०५ )
दिनांक: २२/१२/२०१७ )

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता**
**मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७**
**मा. प्राचार्य, विद्यापीठाशी सलंग्नित सर्व अव्यवसायिक महाविद्यालय.**

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.

# महत्वाच्या सुचना :

१ उपरोक्त शिष्यवृत्ती /अर्थसहाय्य योजनेसाठी विहित केलेल्या तरतुदीनुसार नियम व अटीची पूर्तता करीत असलेल्या विद्यार्थ्यांनीच अर्ज करावेत.

२ विहित केलेल्या शैक्षणिक गुणांच्या टक्केवारीपेक्षा कमी गुण व A.T.K.T असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.

३ "क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना" फक्त मुलींसाठी असून मुलांनी अर्ज करू नयेत.

४ "राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना" फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असून खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.

५ वरील शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेचा फायदा विद्यार्थ्यास संपुर्ण पदवी काळात एकदाच आणि पदव्युत्तर काळात एकदा दिला जात असल्याने ज्या विद्यार्थ्यांनी सन २०१६–१७ मध्ये किंवा त्यापूर्वी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करू नयेत.

६ "क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना" व "आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना" या दोन्ही शिष्यवृत्तीपैकी पदवी अभ्यासक्रमासाठी फक्त एकाच वेळी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी फक्त एकाच वेळी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल.

७ "राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना" व "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती" या दोन्ही शिष्यवृत्तीपैकी पदवी अभ्यासक्रमासाठी फक्त एकाच वेळी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी फक्त एकाच वेळी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल.

८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना त्यांना मिळालेल्या ग्रेड पॉईट चा उल्लेख न करता टक्केवारी मध्ये उल्लेख करावा.

९ विद्यार्थ्यांनी **(Online)** माहिती भरताना अचुक व परिपुर्ण भरावी.

१० विद्यार्थ्याचे फक्त राष्ट्रीयकृत बॅकेतच बचत खाते असावे.

११ विद्यार्थ्यांनी बॅकेची माहिती भरताना स्वत:चे खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बॅकेची अद्ययावत माहिती अर्जामध्ये व्यवस्थितरित्या नमुद करावी. पालकांची अथवा इतर व्यक्तीचा बॅक खाते शिष्यवृत्तीसाठी विचारात घेतले जाणार नाही.

१२ ऑनलाईन **(Online)** अर्जासोबत विद्यार्थ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत **Upload** करावीत इतर कोणतेही कागदपत्रे **Upload** करू नये.

१३ विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

१४ ऑनलाईन **(Online)** अर्जासोबत **Upload करावयाची आवश्यक कागदपत्रे**

- विद्यार्थ्यांचे मागील लगतच्या अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.
- वार्षिक उत्पन्नाचा तहसिलदाराने दिलेला दाखला.
  ("क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना" व "आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना" साठी आवश्यक )
- जातीचा दाखला ("राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना" या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक )
- राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत

वरील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे. याची संबधित विभागाने/महाविद्यालयाने व विद्यार्थ्याने नोंद घ्यावी.

**उपकुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना नियम व अटी

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पुणे विद्यापीठाने महाविद्यालये/विद्यापीठ विभागामध्ये अव्यवसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींसाठी क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना सुरू केलेली आहे.

### अ) नियम व अटी

१. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त १० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमातील जास्तीत जास्त ०५ विद्यार्थीनी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

२. पात्र विद्यार्थीनीस रू. ५०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल.

३. विद्यार्थीनींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/— पेक्षा जास्त नसावे यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.

४. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थिनीस संपूर्ण पदवी आणि पदव्युत्तर काळात एकदाच देण्यात येईल.

५. विद्यार्थिनींने मागील लगतच्या परीक्षेत किमान ५० टक्के गुण संपादित केलेले असावेत. ५० टक्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थीनींचा गुणांनुक्रमे विचार करण्यात येईल.

६. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थीनीने नियमित अभ्यासक्रम प्रवेश घेतलेला असावा.

७. विद्यार्थिनीने व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

८. विद्यार्थीनीची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

९. विद्यार्थीनीस या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.

१०. विद्यार्थीनीस गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

११. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थीनीच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमातील सहभाग उदा. क्रीडा, समाजसेवा, कला इ. विचारात घेण्यात येईल.

१२. विद्यार्थीनीने त्यांच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड)

१३. अर्थसहाय्य योजनेसाठी विद्यार्थ्यानींची निवड करण्यासाठी महाविद्यालय पातळीवर मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठीत करून अर्जाची छाननी करावी.

    १) मा. प्राचार्य (अध्यक्ष)
    २) महाविद्यालयातील समन्वयक, विद्यार्थी कल्याण योजना
    ३) महाविद्यालयातील विविध शाखांच्या तीन प्राध्यापिका

१४. विद्यार्थीनीने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

१५. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## आर्थिक दुर्बल घटक अर्थसहाय्य योजना नियम व अटी

आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालये/विद्यापीठ विभागामध्ये अव्यवसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक दुर्बल घटक अर्थसहाय्य योजना कार्यान्वित केलेली आहे.

**अ) नियम व अटी**

१. विद्यार्थ्याच्या पालकांचे (कुटूंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/— पेक्षा जास्त नसावे. यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.

२. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त २० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमास जास्तीत जास्त १० विद्यार्थी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

३. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमासाठी रू. ३,०००/— व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रू. ६,०००/— असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

४. विद्यार्थ्याने मागील लगतच्या परीक्षेत किमान ६५ टक्के गुण संपादित केलेले असावेत.

५. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

७. विद्यार्थ्यास या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.

८. व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची नोंदणी नसावी.

९. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

१०. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा सांक्षाकित दाखला जोडणे आवश्यक राहील.

११. विद्यार्थ्याने त्याच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅकेचे नाव, पत्ता,खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड).

१२. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त असावेत.

१३. विद्यार्थ्याने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

१४. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

१५. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

उपकुलसचिव,

**शैक्षणिक प्रवेश विभाग**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती नियम व अटी

**अ) नियम व अटी**

१. सदरची योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागु होणार आहे.

२. सदरच्या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतेही अट राहणार नाही केवळ गुणवत्ता हाच निकष राहील.

३. मागील लगतच्या परिक्षेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी किमान ६०% गुण संपादित केलेले असावेत.

४. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्यांने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

५. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासक्रमात किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक राहील यासंदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

६. सदर शिष्यवृत्तीचा एकुण २००० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लाभ मिळणार असून त्यापैकी ५०% विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मागासवर्ग प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता) विचारात घेऊन व उर्वरित ५०% गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवर्गासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार शिष्यवृत्ती लाभ दिला जाईल.

७. पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या जास्तीत जास्त ८०० आणि पदवी अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त १२०० विद्यार्थ्यांचे अर्ज शिष्यवृत्तीसाठी विचारात घेतले जातील.

८. पात्र विद्यार्थ्यास पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रू. १८,०००/— व पदवी अभ्यासक्रमासाठी रू. १२,०००/— असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

९. सर्व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल. भारत सरकार शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र असतील तथापि, या शिष्यवृत्तीसहीत दोन पेक्षा जास्त शिष्यवृत्ती घेण्यास सदर विद्यार्थी पात्र नसेल.

१०. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

११. विद्यार्थ्यांने त्याच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅकेचे नाव, पत्ता, खाते क्र. (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड)

१२. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त किंवा प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यताप्राप्त असावेत.

१३. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यांस संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

१४. पात्र विद्यार्थ्यांचे वय पदवी अभ्यासक्रमाकरीता २५ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता ३० पेक्षा जास्त नसावे.

१५. विद्यार्थ्यांने आणि संबंधित प्राचार्याने एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

१६. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना

### अ) नियम व अटी

१. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने मागील लगतच्या परीक्षेत किमान ७०% गुण संपादित केलेले असावेत.

२. सर्व अव्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल. व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी नसावी.

३. पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या जास्तीत जास्त ८०० आणि पदवी अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त १२०० विद्यार्थ्यांचे अर्ज शिष्यवृत्तीसाठी विचारात घेतले जातील.

४. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु. १८,०००/— व पदवी अभ्यासक्रमासाठी रु. १२,०००/— शिष्यवृत्ती देण्यात येईल.

५. पात्र विद्यार्थ्यांचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २३ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता २५ पेक्षा जास्त नसावे.

६. विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक राहील, या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

७. महाविद्यालय/ विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

८. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थ्याने त्याच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड)

१०. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक राहील.

११. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त असावेत.


१२. विद्यार्थ्याने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

१३. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.


उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

# माहितीपुस्तिका

Scholarship Link : http://bcud.unipune.ac.in/Scholorships/scholarships/Login.aspx





Student login .. then click on "**Apply Here**" button. And click here





Clicked on "**Apply Here**" the following window will opened and he is able to fill the form after Enter the "**Eligibility number".** And click on search button**.**


Here student fill his/her details. Clicked on “**Submit Button”**



After clicked on “**submit**” button he will comes on **Home page** here the Student is able to **view** his/her details. And “**Apply here**” will be disabled.




Clicked on “**View**”Button An open this From




Back

**Personal Details**

| | | | |
|---|---|---|---|
| Eligibility No. : | 12017126918 | College Code : | C002144 |
| Scholarship : | आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना | Course Type : | UG |
| Name : | CHAVAN PRATHAMESH SAMBHAJI | | |
| Mother Name : | JAYASHRI | | |
| Address : | Sangamner | | |
| Pincode : | 413001 | City : | solapur |
| District : | solapur | State : | MH |
| Phone : | 3354345353 | Mobile : | 3245425436 |
| Category : | OPEN | Sex : | MALE |

**Academic Details**

| | | | |
|---|---|---|---|
| Last Year Percentage : | 82.35 | Annual Income : | 140000.0000 |
| Course : | | | |

**Bank Details**

| | | | |
|---|---|---|---|
| Bank Name : | ORIENTAL BANK OF COMMERCE | MICR Code : | 245252452 |
| Account No. : | 2564202354225 | IFSC Code : | SBIN0005645 |
| Branch Name : | gdfgdfgfdgd | | |